राज्य निवडणूक आयोग
आवक क्र. ६८५६...
दिनांक १४/१०/१६
शाखा २

~~महाराष्ट्र शासन~~

क्र.संकिर्ण-२०१६/प्र.क्र.१८ /पंरा-२
ग्रामविकास व जलसंधारण विभाग,
बांधकाम भवन, २५ मर्झबान पथ,
फोर्ट, मुंबई-४०० ००१.
दिनांक ७ ऑक्टोंबर २०१६.

दु.क्र./फॅ.क्र.२२८३९९२४
E-mail: rdd.panchayatraj2@gmail.com

प्रति,

मुख्य कार्यकरी अधिकारी,
सर्व जिल्हा परिषद.

**विषय:-** शौचालयाचा वापर करीत असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यासाठी ग्रामसभेची बैठक आयोजित करणे बाबत.

**संदर्भ:-** या विभागाचे समक्रमांक दिनांक २९ फेब्रुवारी २०१६ चे पत्र.

महोदय,

राज्यातील महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती तसेच ग्रामपंचायत निवडणुक लढविणा-या उमेदवारांसाठी महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ च्या कलम १६ च्या कलम (प) व महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ च्यां कलम १४ च्या उपकलम (ज-५) मध्ये शौचालयाच्या संदर्भात खालीलप्रमाणे तरतुद करण्यात आलेली आहे.

जी व्यक्ती-

(एक) तिच्या मालकीच्या घरात राहत असुन, त्या घरामध्ये शौचालय आहे व ती अशा शौचालयाचा नियमितपणे वापर करीत आहे , किंवा

(दोन) तिच्या मालकीच्या घरात राहत नाही, आणि त्या घरामध्ये शौचालय आहे, व ती अशा शौचालयाचा नियमितपणे वापर करीत आहे. किंवा तिच्या घरामध्ये शौचालय नाही मात्र ती सार्वजनिक शौचालयाचा नियमितपणे वापर करीत आहे,

असे प्रमाणित करणा-या ग्रामसभेच्या ठरावासोबत संबंधित पंचायतीचे प्रमाणपत्र सादर करण्यात कसुर करील, अशी व्यक्ती निवडुन येण्यास आणि सदस्य होण्यास निरर्ह ठरेल.

वरील पार्श्वभुमीवर महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती तसेच ग्रामपंचायत निवडणुक लढविणा-या उमेदवारांसाठी विहित वेळेत ग्रामसभेकडुन शौचालयासंदर्भात प्रमाणपत्र प्राप्त होणे आवश्यक आहे. त्यादृष्टीने ग्रामसभांचे आयोजनाचे नियोजन होणेही आवश्यक आहे.

राज्यात एका आर्थिक वर्षात ग्रामपंचायतीच्या कमीत कमी चार ग्रामसभा घेणे आवश्यक आहे. जिल्हा परिषद व पंचायत समिती तसेच ग्रामपंचायतीची मुदत संपण्याच्या सहा महिने अगोदर राज्य निवडणुक आयोगाकडुन प्रभागरचनेचा कार्यक्रम जाहीर करण्यात येतो. या सहा महिन्याच्या कालावधीत होणा-या ग्रामसभेमध्ये किंवा राज्य निवडणुक आयोगाकडुन निवडणुकांचा कार्यक्रम घोषित झाल्यानंतर निवडणुक लढवु इच्छिणा-या

उमेदवारांकडुन शौचालयाच्या प्रमाणपत्रासाठी प्राप्त होणा-या अर्जावर निर्णय घेण्यासाठी विशेष ग्रामसभेचे आयोजन करण्याबाबत तसेच अपवादात्मक परिस्थितीत ग्रामसभेचे आयोजन होवु शकले नाही तर अशा परिस्थितीत सहायक गट विकास अधिकारी यांनी ग्रामसेवकाच्या शिफारशीवरुन शौचालयाचे प्रमाणपत्र देण्याची कार्यवाही करावी, असे सर्व संबंधित अधिकारी/कर्मचारी यांना आवश्यक ते निदेश द्यावेत. अशी आपणास विनंती आहे.

आपला,

(संजय बनकर)
उपसचिव, महाराष्ट्र शासन

प्रत:-१ मा.सचिव, राज्य निवडणुक आयोग, नवीन प्रशासकिय इमारत, मंत्रालयासमोर, मुंबई यांना माहितीसाठी सादर.

२. मा. उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत), जिल्हा परिषद, सर्व यांना पुढील कार्यवाहीसाठी प्रत अग्रेषित.

३. मा.मंत्री (ग्रा.वि. व पं.रा.) यांचे खाजगी सचिव यांना माहितीस्तव प्रत अग्रेषित.

४. मा.राज्यमंत्री (ग्रा.वि. व पं.रा.) यांचे खाजगी सचिव यांना माहितीस्तव प्रत अग्रेषित.

२

**महाराष्ट्र शासन**

क्र.संकिर्ण-२०१६/प्र.क्र.१८ /पंरा-२
ग्रामविकास व जलसंधारण विभाग,
बांधकाम भवन, २५ मर्झबान पथ,
फोर्ट, मुंबई-४०० ००१.
दिनांक : २९ फेब्रुवारी, २०१६.

दु.क्र/फॅ.क्र.२२८३९९२४
E-mail: rdd.panchayatraj2@gmail.com

प्रति,

मुख्य कार्यकरी अधिकारी, जिल्हा परिषद
सर्व.

विषय:- शौचालयाचा वापर करीत असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यासाठी ग्रामसभेची बैठक आयोजित करणे बाबत.

महोदय,

राज्यातील महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती तसेच ग्रामपंचायत निवडणुक लढविणा-या उमेदवारांसाठी महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ च्या कलम १६ च्या कलम (प) व महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ च्या कलम १४ च्या उपकलम (ज-५) मध्ये शौचालयाच्या संदर्भात खालीलप्रमाणे तरतुद करण्यात आलेली आहे. जी व्यक्ती-

(एक) तिच्या मालकीच्या घरात राहत असुन, त्या घरामध्ये शौचालय आहे व ती अशा शौचालयाचा नियमितपणे वापर करीत आहे , किंवा

(दोन) तिच्या मालकीच्या घरात राहत नाही, आणि त्या घरामध्ये शौचालय आहे, व ती अशा शौचालयाचा नियमितपणे वापर करीत आहे. किंवा तिच्या घरामध्ये शौचालय नाही मात्र ती सार्वजनिक शौचालयाचा नियमितपणे वापर करीत आहे,

असे प्रमाणित करणा-या ग्रामसभेच्या ठरावासोबत संबंधित पंचायतीचे प्रमाणपत्र सादर करण्यात कसुर करील, अशी व्यक्ती निवडुन येण्यास आणि सदस्य होण्यास निरर्ह ठरेल.

वरील पार्श्वभुमीवर महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती तसेच ग्रामपंचायत निवडणुक लढविणा-या उमेदवारांसाठी विहित वेळेत ग्रामसभेकडुन शौचालयासंदर्भात प्रमाणपत्र प्राप्त होणे आवश्यक आहे. त्यादृष्टीने ग्रामसभांचे आयोजनाचे नियोजन होणेही आवश्यक आहे.

राज्यात एका आर्थिक वर्षात ग्रामपंचायतीच्या कमीत कमी चार ग्रामसभा घेणे आवश्यक आहे. जिल्हा परिषद व पंचायत समिती तसेच ग्रामपंचायतीची मुदत संपण्याच्या सहा महिने अगोदर राज्य निवडणुक आयोगाकडुन प्रभागरचनेचा कार्यक्रम जाहीर करण्यात येतो. या सहा महिन्याच्या कालावधीत होणा-या ग्रामसभेमध्ये किंवा राज्य निवडणुक आयोगाकडुन निवडणुकांचा कार्यक्रम घोषित झाल्यानंतर निवडणुक लढवु इच्छिणा-या उमेदवारांकडुन शौचालयाच्या प्रमाणपत्रासाठी प्राप्त होणा-या अर्जावर निर्णय घेण्यासाठी

विशेष ग्रामसभेचे आयोजन करण्याबाबत सर्व संबंधित अधिकारी/कर्मचारी यांना आवश्यक ते निदेश दयावेत, अशी आपणास विनंती आहे.

आपला,

(म.ब.महोले)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत:-१. मा.सचिव, राज्य निवडणुक आयोग, नवीन प्रशासकिय इमारत, मंत्रालयासमोर, मुंबई यांना माहितीसाठी सादर.

२. मा. उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत), जिल्हा परिषद, सर्व यांना पुढील कार्यवाहीसाठी प्रत अग्रेषित.

३. मा.मंत्री (ग्रा.वि. व पं.रा.) यांचे खाजगी सचिव यांना माहितीस्तव प्रत अग्रेषित.

४. मा.राज्यमंत्री (ग्रा.वि. व पं.रा.) यांचे खाजगी सचिव यांना माहितीस्तव प्रत अग्रेषित.